**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १२/०४/२०२५ (शनिवार)**

---

## उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत एम.एम.पी.कंपनी धुरखेडा येथे झालेल्या स्पोटाबाबत

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ११/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना माहीती मिळाली की, धुरखेडा येथील एम.एम.पी. या कंपनीमध्ये स्पोट झाला आहे. अशी माहीती प्राप्त होताच उमरेड पोलीस तात्कळ फायर ब्रिगेड आणि अॅमुलन्स यांना माहीती देवुन घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी नमुद कंपनीमध्ये स्पोटामुळे आग लागलेली होती. अग्निशमन दलाच्या मदतीने अगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. धुरखेडा येथील एम.एम.पी.कंपनी ही अॅल्युमिनीयम पावडर आणि अॅल्युमिनीयम फॉईल ची निर्मिती करणारी कंपनी असुन सदर कंपनीमध्ये झालेल्या स्पोटामध्ये काल संध्याकाळ पर्यंत कंपनी मधील ९ कामगार जखमी झाले असुन ३ कामगार बेपत्ता होते. आज दिनांक १२/०४/२०२५ रोजी ३ कामागांराचे मृतदेह मिळुन आले. ९ जखमीपैंकी २ कामगांराचा मृत्यु झाला. जखमी कामगारांची नावे **१. कमलेश सुरेश ठाकरे,रा. गोंडबोरी, २. पियुष बाबरावजी टेकाम, रा. पांजरेपार,३.मनिष अमरनाथ वाथ, रा. पेंडराबोडी, ४. करण भास्कर बावने,रा पेंडराबोडी, ५.नवनित विठोबा कुमरे, रा पांजरेपार ,६.करण तुकाराम शेंडे रा. गोंडबोरी, ७. हरीदास नैताम वय ४५ वर्षे** असे जखमी झाले असुन त्यांना मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतकांची नावे **१.निखील गंगाधर नेहारे ,वय २४ वर्षे, २. निखील तुकाराम शेंडे,वय २५ वर्षे, ३. अभिलेख कमलाकर झंझाळ,वय २० वर्षे, ४. पियुष वासुदेव दुर्गे, वय २१ वर्षे,आणि ५. सचिन पुरूषोत्तम मसराम, वय २६ वर्षे यांचा मृत्यु झाला आहे.** मृतदेह उत्तरीय तपासणी करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे रवाना करण्यात आले आहे. कंपनीचे एच.आर. मॅनेजर आशिष मेश्राम यांना विचारपुस केली असता सदर स्पोट दिनांक ११/०४/२०२५ रोजी संध्याकाळी ०६:४५ वाजताचे सुमारास झाल्याबाबत सांगितले. प्रथमदर्शी सदर स्पोट कंपनीमध्ये कोणीतरी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे

झालेला आहे असे दिसते त्यामुळे सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुदध कलम २८७ ,१२५(बी) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **सदर गुन्हयामध्ये आज रोजी कलम १०६(१) भा.न्या.सं (निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभुत होणे ) अन्वये कलम वाढ करण्यात आलेली आहे.**

सदर घटनास्थळी मा. श्री. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी ,नागपुर ,मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्रीमती वृष्टी जैन , उपविभागिय पोलीस अधिकारी,उमरेड तथा सहा पोलीस अधिक्षक , पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी उमरेड , श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नागपुर ग्रामीण यांनी भेट देवुन घटनास्थळाची पाहणी केली. तसेच सहा. आयुक्त, कामगार, तहसीदार उमरेड, अग्निशमण विभागाचे अधिकारी, Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी, यांनी सुध्दा भेट दिली आहे. **(DISH) चे अधिकारी यांनी बारकाईने घटनास्थळाचे निरीक्षण केले असुन सदर प्रकरणात चौकशी करून नमुद कंपनी किंवा संबधित अधिकारी यांच्या कडुन कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाले किंवा कसे या बाबत चौकशी अहवाल देणार आहे. त्या चौकशी अहवालाच्या अधारे सदर गुन्हयात आरोपी निष्पन्न करून सदर गुन्हयात संबधितांना आरोपी करून त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक ११/०४/२०२५ रोजी रात्री मौदा पोलीस ,पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असतांना ट्रक क्रमांक एम.एच ४० सी.टी ६५२७ असा संशयीत रित्या मिळुन आला. ट्रक चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता **तुषार अंकुश रेहपांडे,वय २९ वर्षे, पत्ता. चितापुर ता.जि. भंडारा अशी माहीती प्राप्त झाली.** वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** वाहना मधुन १० ब्रास रेती किंमती

५०,०००/— रूपये आणि **२) वाहन —** ट्रक क्रमांक एम.एच ४० सी.टी ६५२७ किंमती ४५,००,०००/— रूपये **असा एकुण ४५,५०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

टिप्पर चालक आरोपी नामे **तुषार अंकुश रेहपांडे,वय २९ वर्षे, पत्ता. चितापुर ता.जि. भंडारा याच्या** विरूध्द पोस्टे मौदा येथे **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने